N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईदर, वसई-विरार **P.S.(ठाणे):** कशिमिरा
**Year (वर्ष):** 2024
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0216
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/03/2024 19:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Date From (दिनांक पासून):** 18/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Time From (वेळेपासून):** 12:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/03/2024 **Time (वेळ):** 18:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/03/2024 18:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.50 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गुन्हे शाखा युनिट-1,काशिमिरा, मिरा भाईंदर वसई ,विरार आयुक्तालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** फुलचंद लालबहादुर यादव
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वंदना काम्प्लेक्स, ,बी विंग, कालुरी इस्टेट,भाईंदर पुर्व,कशिमिरा,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वंदना काम्प्लेक्स, ,बी विंग, कालुरी इस्टेट,भाईंदर पुर्व,कशिमिरा,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास जयवंत टोकळे | | | 1. गुन्हे शाखा युनिट-1, काशिमिरा,,मिरा भाईंदर वसई विरार,आयुक्तालय,कशिमिरा, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक27/03/2024

मी फुलचंद लालबहादुर यादव, वय - 56 वर्ष, व्यवसाय-होमगार्ड, राहणार-वंदना कॉम्प्लेक्स, बी विंग, कालु इस्टेट, भाईंदर (पुर्व) असा असून, समक्ष हजर राहून अशी फिर्याद देतो की,

मी वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबासमवेत राहत असून, मला मराठी व हिंदी भाषा लिहीता व वाचता येते.

माझा लहान भाउ रामकैलास लालबहादुर यादव, वय - 40 वर्ष, यांचे विरूध्द विरार पो.स्टे. येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल झालेला आहे. त्याचा गुन्हा रजि. नं. 1145/2023 असा असून दाखल दिनांक 13/12/2023 अशी आहे. यामध्ये माझा भाउ रामकैलास यास दिनांक 29/02/2024 रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर सदर गुन्हयाचा तपास ए.पी.आय. श्री. कैलास टोकळे, नेमणुक-गुन्हे षाखा, युनिट-1, काशिमिरा हे करीत आहेत.

माझा भाउ रामकैलास हा पोलीस कोठडीत असताना मी त्यास भेटण्यासाठी काशिमिरा क्राईम युनिट येथे गेलो असता तेथे सदर गुन्हयाचे तपास अधिकारी श्री. कैलास टोकळे, सहा. पोलीस निरीक्षक हे भेटले. ती तारीख 01/03/2024 अशी होती. तेव्हा त्यांनी मला सदर गुन्ह्यात माझा भाउ रामकैलास यादव यास लवकर जामीन मिळवुन देण्यासाठी तसेच गुन्हयातील कागदपत्रे आमचे सोयीने बनविण्यासाठी 10 लाख रूपयांची मागणी केली होती. परंतु मी इतकी रक्कम देवु शकत नसल्याचे त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी मला पैसे न दिल्यास तुझे भावाला जामीन होवू देणार नाही आणी गुन्ह्यात अधिकचे कलम लावेल असे सांगितले. त्यावर मी त्यांना किती होतात ते बघुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर मी तेथुन निघुन गेलो.

दिनांक 04/03/2024 रोजी मला माझे मोबाईल क्र. 8779935569 या क्रमांकावर अनोळखी नंबर 9767333311 या क्रमांकावरून फोन आला व समोरून बोलणा-या इसमाने टोकळे साहेबांच्या पैशाचे काय झाले अशी विचारणा केली तेव्हा मी उद्या सांगतो असे बोलुन फोन कट केला.

माझा भाउ श्री. रामकैलास यादव यास त्याच्याविरूध्द दाखल गुन्हयात जामीन मिळवून देण्यासाठी तपास अधिकारी सहा.पो.निरीक्षक श्री. कैलास टोकळे यांनी 10 लाख रूपयांची मागणी केलेली असून सदर रक्कम त्यांना देण्याची माझी कोणतीही इच्छा नसल्याने त्यांचेविरूध्द भ्रश्टाचार प्रतिबंधक कायदयान्वये कारवाई होणेकरीता मी अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे येथे दिनांक 14/03/2024 रोजी तक्रार दिली आहे.

त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी मी, दिलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी दरम्यान लाचेची रक्कमेची मागणी झालेनंतर लाचेचा सापळा आयोजित करणार असल्याची माहिती मला दिली. तसेच पर्यवेक्षण अधिकारी म्हणून श्रीमती माधवी राजेकुंभार, पोलीस उप अधीक्षक, अॅसीबी, ठाणे काम करणार असल्याची माहिती दिली. त्यानतर पोनि थोरात यांनी मला, दोन्ही पंचांना व पडताळणी पथकास सुचना दिल्या.

तदनंतर मी, पंच, पडताळणी पथक, पोनि थोरात व पोउपअधी श्रीमती राजेकुंभार असे खाजगी वाहनाने काशिमिरा येथे गेलो. तेथे मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. मोरे यांचेसह गुन्हे षाखा, युनिट-1, काषिमिरा येथे पाठविले. मी सदर ठिकाणी गेलो असता, त्यावेळी तेथे मला सपोनि श्री. सुर्वे भेटले. त्यावेळी सपोनि श्री. सुर्वे यांनी पंच श्री. मोरे यांना खाली थांबण्यास सांगितले. त्यानुसार पंच श्री. मोरे हे खाली थांबून राहिले. त्यानंतर मी सपोनि श्री. सुर्वे यांना सपोनि श्री. टोकळे यांना भेटण्याकरीता आलो असल्याचे सांगितले असता, सपोनि श्री. सुर्वे यांनी मला सपोनि श्री. टोकळे हे रजेवर असून, दिनांक 18/03/2024 रोजी कर्तव्यावर हजर होणार असल्याचे सांगितले. तदनंतर मी माझे स्वतःचा मोबाईल नंबर 8779935569 वरून लोकसेवक श्री. टोकळे यांचे मोबाईल 9767333311 वर कॉल केला. त्यामुळे मी सपोनि श्री. टोकळे यांना '' हॅलो ह... टोकळे

साहेब.. अ... अ.. टोकळे सहाब मै आया था ईधर पोलीस स्टेशन.... हॅलो...अ... ईधर पोलीस स्टेषन. आया था आपको मिलने के लिए.. यादव बोल रहा हॅु सर.... अ.... हॅलो... अ... सर आया था... पोलीस स्टेशन आपको मिलने के लिए..वो...'' असे बोललो. त्यावर लोकसेवक श्री. टोकळे '' हं '' असे बोलले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. टोकळे यांना '' अब सुर्वे सहाब मिले थे कैसे करने का है सहाब... पैसे का... वो भाई का बेल के लिए आप हेल्प करेंगे बोले थे... तो ईसी के लिए आया था... यादव बोल रहा हूॅं. सर वो राम कैलास रामबहादुर लाल यादव राम कैलास रामबहादुर लाल का भाई... अ... अभी उनका बेल के लिए आप हेल्प करने के लिए बोले थे ना सर... उसी के लिए आया था....हा सर... हा सर आप थोडा हेल्प करने के लिए बोले थे ना... जो.... हा जी... हा सर... सर मै... मॅटर नही समझे क्या आप... '' असे सपोनि श्री. टोकळे यांना बोललो. त्यावर सपोनि श्री. टोकळे यांनी फोन कट केला. त्यानंतर मी तीन वेळेस सपोनि श्री. टोकळे यांना फोन केला परंतु त्यांनी उचलला नाही. त्यानंतर मी व पंच खाजगी वाहन उभे असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर लोकसेवक श्री. टोकळे हे सुटीवरुन परत आल्यानंतर दिनांक 18/03/2024 रोजी पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. सदरच्या कारवाईचा पंचनामा करण्यात आला आहे.

तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून मी दिनांक 18/03/2024 रोजी अॅसीबी, ठाणे कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पोनि श्री. थोरात यांनी आम्हा सर्वांना योग्य त्या सुचना दिल्या. तद्नंतर मी, पंच, पोनि श्री. थोरात व पडताळणी पथक असे आम्ही काशिमिरा येथे खाजगी वाहनामधून निघालो. तेथे पोहचल्यावर मला डिजीटल रेकाॅर्डर लावून पंच श्री. मोरे यांचेसह लोकसेवक सपोनि श्री. टोकळे यांचे कार्यालयात पडताळणीसाठी पाठविले असता, तेथे पोहचल्यावर पंच श्री. मोरे व मी तेथील तळमजला अधिक पहिला मजला असलेल्या कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर गेलो. तेथे श्री. टोकळे साहेब त्यांचे केबीनमध्ये बसले होते. त्यावेळी तेथे सपोनि श्री. सुर्वे देखील बसले होते. मी व पंच श्री. मोरे असे श्री. टोकळे साहेबांसमोर गेलो असता, टोकळे साहेबांनी पंच श्री. मोरे यांचेबद्दल विचारले, तेव्हा मी त्यांना माझा मित्र असल्याचे सांगितले. त्यावेळी सपोनि श्री.टोकळे साहेबांनी पंच श्री. मोरे यांना बाहेर बसण्यास सांगितले. त्यानंतर पंच श्री.मोरे हे बाहेर जावून थांबून राहिले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे साहेबांनी मला '' बोलो क्या चल रहा है...'' तेव्हा मी त्यांना '' बस....क्या वही चल रहा है. भाईवाली केस में भाग दौड कर रहा हु....'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी माझेशी माझे भावाचे केस बाबत बातचित केली. त्यानंतर मी सपोनि श्री. टोकळे यांना '' कुछ हेल्प करते हो तो बताईये..'' असे विचारले. त्यावर त्यांनी मला '' बताईये क्या हेल्प चाहिये... ...वो बताईये.. क्या हेल्प चाहिये..'' असे विचारले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी मला '' क्या होगा...मैने पेहलेच बोला था...'' असे विचारले. त्यावर मी त्यांना '' हा बोले थे आप साहब आप.... लेकिन मै तो पहेले बोला थोडा टाईम लगेगा..ये लोग...'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी मला ''महिना हो गया.....एक महिना हो गया ना....'' असे सांगितले. त्यावर मी सपोनि श्री. टोकळे यांना '' हा महिना नही हुआ साहब....महिना नही हुआ....'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी मला ''महिना ऐसा ही बीत गया..'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी मला हाताने इशारा करून, रक्कमेबाबत विचारणा केली. त्यावर मी त्यांना '' आप जो काम बोले थे साहब वो हो गया है साहब थोडा ही बाकी है..आप जैसा बोलिये...'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी माझेबरोबर इतर संभाषण केले व मला '' कैसा करने का '' असे विचारले. त्यावर मी त्यांना ''आप बताईये साहब.'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी मला '' तुझे बोला था '' असे सांगून, त्यांचे मोबाईलमधील कॅलक्युलेटर 10,00,000 असे लिहून दाखविले. ते पाहून मी त्यांना '' दस लाख '' विचारले. त्यावर सपोनि श्री. टोकळे हे ''हं'' असे बोलले. त्यानंतर मी सपोनि श्री. टोकळे यांना ''सर अभी आधा लिजिए .....आधा बाद मे लिजीए...'' असे सांगितले. त्यावर सपोनि श्री. टोकळे यांनी मला ''कब बाद मे... दुसरा कोई काम नही है ''असे विचारले असता, मी त्यांना ''आधा आज दे सकता हॅु पाच लाख तक..''असे सांगितले. त्यावर सपोनि श्री. टोकळे यांनी मला ''हं.. आधा कब'' असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना ''पाच पाच लाख के लिए थोडा दोचार दिन टाईम दिजीए.''असे सांगितले.त्यावर मी सपोनि श्री. टोकळे यांनी मला '' हं....ठिक आहे.....अभी लेॆके आओ..'' असे सांगितले. त्यावर मी सपोनि श्री. टोकळे यांना मी ''हा..ठिक है...'' असे बोललो व सपोनि श्री. टोकळे यांचे केबीनमधून बाहेर पडून, मी व पंच नं 1 श्री. मोरे यांचेसमवेत रिक्षाने खाजगी वाहन उभे होते तेथे आलो. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी सदरचे डिजीटल रेकाॅर्डरमधील संभाशण एैकल्यानंतर माझेकडे सपोनि श्री. टोकळे यांनी माझे भाउ श्री. रामकैलास यादव यांचेविरूध्द दाखल गुन्हयामध्ये जामीन मिळवून देण्यासाठी 10 लाख रूपयांची मागणी करीत असून, त्यापैकी पहिला हप्ता म्हणून 5 लाख रूपये आज दिनांक 18/03/2024 रोजी स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी माझेकडे लोकसेवक श्री. टोकळे यांना दयावयाची 5,00,000/- रूपये लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, त्यावेळी माझेकडे लोकसेवक श्री. टोकळे यांना देण्याकरीता 50,000/-

रूपयांची व्यवस्था झालेली असल्याने, मी पोनि श्री. थोरात यांचेकडे 50,000/- रू. हजर केले, त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी उर्वरीत 4,50,000/- रू. करीता खेळण्यातील नकली नोटा (डाॅय नोट) चा वापर करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी त्यांचे कार्यालयीन बॅगेतून खेळण्यातील नकली नोटा (डाॅय नोट) बाहेर काढल्या. सदरच्या नोटा मला व पंचांना दाखविल्या त्यामध्ये 500/- रूपये दराच्या एकुण 900 नोटा असे एकुण 4,50,000/- रूपये असल्याचे दिसून आले. त्यानंतर सदर नोटांना मपोशि डोबरे यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावून, रू. 50,000/- रक्कमेच्या चलनी नोटा व 4,50,000/- रूपयांच्या नकली नोटा अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या प्लास्टीकच्या पिशवीमध्ये ठेवून सदरची प्लास्टीक पिशवी माझेकडील काळया रंगाच्या सॅक बॅगमध्ये ठेवून दिली.

तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी आम्हा सर्वांना योग्य त्या सुचना दिल्या व तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे खाजगी वाहनामधून सापळा पथक व पंच श्री. कुटे असे रिक्षाने गुन्हे शाखा युनिट 1, काशिमिरा येथे गेले. तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मला डिजीटल रेकाॅर्डर लावल्यानंतर मी व पंच श्री. मोरे असे खाजगी वाहनातून उतरून पायी चालत गुन्हे शाखा युनिट 1, काशिमिरा च्या दिशेने गेलो, त्यावेळी लाचेची रक्कम असलेली काळया रंगाची सॅक बॅग पंच नं 1 श्री. मोरे यांचेकडे होती. आमचे मागोमाग पोनि श्री. थोरात व पोना पारधी असे खाजगी वाहनातून उतरून गुन्हे शाखा युनिट 1,काशिमिरा च्या दिशेने गेले व तेथे सापळा रचून थांबून राहिले. युनिट कार्यालयाचे आवारामध्ये पोहचल्यानंतर मी व पंच श्री. मोरे गुन्हे शाखा युनिट 1 चा जिना चढून पहिल्या मजल्यावरील कार्यालयात गेलो. त्यावेळी तेथे सपोनि श्री. टोकळे हजर नव्हते, म्हणून मी व पंच श्री. मोरे पुन्हा खाली येवून थांबून राहिलो. त्यानंतर मी त्यांना 4 वेळेस नाॅर्मल काॅल केला परंतु त्यांनी उचलला नाही. तद्नंतर त्यांना व्हाॅटसअॅप काॅल केला असता, त्यांनी '' सारख सारख काय आहे...10 मिनीट थांबा ना..'' असे बोलून फोन कट केला. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी इशा-याने मला व पंच श्री. मोरे यांना खाजगी वाहनामध्ये जाण्यास सांगितले व त्यानुसार आम्ही खाजगी वाहनामध्ये जावून बसलो. त्यावेळी पोना पारधी यांनी माझेकडील यांचेकडील डिजीटल रेकाॅर्डर काढून तो बंद केला. त्यावेळी सपोनि श्री. टोकळे यांचे मोबाईल नंबर 9767333311 वरून माझे मोबाईल वर व्हाॅटसअॅप काॅल येवू लागला. तेव्हा पोनि श्री. थोरात यांनी मला काॅल उचलून स्पिकर फोन आॅन करण्यास सांगितले व पोना पारधी यांना सदरचा काॅल डिजीटल रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रित करण्यास सुचना दिल्या. त्यानुसार पोना पारधी यांनी डिजीटल रेकाॅर्डर चालू केला व मी सदरचा काॅल उचलून स्पिकर आॅन केला. त्यावेळी सपोनि श्री. टोकळे यांनी मला '' कहा हो '' असे विचारले. त्यावर मी त्यांना '' पोलीस स्टेशन के पास ही हु सर....कहा पे आउ'' असे सांगितले. त्यावर सपोनि श्री. टोकळे यांनी '' दिख नही रहे. आजा ओ ना..आओ पोलीस स्टेशन के पास..'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना '' ठिक है..पोलीस स्टेशन के पास आता हु..ओके..सर'' असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी फोन कट केला. सदरच्या व्हाॅटसअॅप काॅल वरून सपोनि श्री. टोकळे हे कार्यालयामध्ये आले असून ते मला पोलीस स्टेशनचे नजीक बोलवित असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानुसार पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोना पारधी यांनी मला डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर लावल्यानंतर मी व पंच श्री. मोरे खाजगी वाहनातून उतरून पायी चालत गुन्हे शाखा युनिट 1, काशिमिरा च्या दिशेने गेलो. तेथे पोहचल्यावर सपोनि श्री. टोकळे यांनी माझे नजीक येवून '' चाय पियेगा'' असे विचारले व त्याचवेळी पंच नं 1 श्री. मोरे यांना उद्देशुन '' हे कोण आहे? सकाळी आले होते ते काय? '' असे विचारून पंच श्री. मोरे यांना त्यांचे नाव, गाव, व कामाबद्दल विचारले, त्यावर पंच श्री. मोरे यांनी त्यांचे नाव अजित मोरे, गाव पुण्यातील शिरूर व ड्रायविंगचे काम करतो असे सांगितले. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी एक रिक्षा बोलावून, त्यामध्ये मला इशा-याने बसण्यास सांगितले. सपोनि श्री. टोकळे यांनी मला सांगितलेवरून मी रिक्षामध्ये बसलो. त्यावेळी सपोनि श्री. टोकळे यांनी मला इशा-याने त्यांचे हाताच्या बोटाचा अंगठा व तर्जनी एकमेकावर घासून, लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना '' साहेब पैसा बॅग मे ही रह गया'' असे सांगितले. त्यावर सपोनि श्री. टोकळे यांनी '' राहुदे राहुदे बघु नंतर'' असे बोलून '' यादवजी का पासबुक...कब आएगा'' असे विचारले. त्यावर मी त्यांना '' कल लाता हू'' असे सांगितले. त्यानंतर आम्ही सदर रिक्षामधून आम्ही अंदाजे 200 मीटर जावून पुन्हा कार्यालयाचे आवारात आलो. त्यानंतर सपोनि श्री. टोकळे यांनी मला रिक्षामधून उतरून तेथेच थांबण्यास इशा-याने सांगितले. त्यानंतर ते एका व्यक्तीशी बोलले व पांढ-या रंगाचे गाडीमधून निघून गेले. त्यानंतर काही वेळाने मी त्यांना फोनद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा फोन लागला नाही. त्यानंतर मी व पंच श्री. मोरे असे पुन्हा खाजगी वाहनामध्ये परत आलो. त्यावरून सपोनि श्री. टोकळे हे माझेकडे लाचेची रक्कम स्विकारणार नसल्याची माझी व सापळा पथकाची खात्री झाली. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी मला सांगितले की, जर सपोनि श्री. टोकळे यांनी फोन करून लाचेची रक्कम लागलीच आणून देण्यास सांगितल्यास, सपोनि श्री. टोकळे यांचेकडून दुसरे दिवशीचा अवधी मागून घ्यावा व लागलीच पोनि

श्री. थोरात यांना कळवावे. तसेच आम्हा पंचाना तसेच पडताळणी पथकातील कर्मचारी यांना गोपनियता बाळगण्याच्या सुचना देवुन, मला, पंचांना व पडताळणी पथकास सपोनि श्री. टोकळे यांचेकडून मला यांना निरोप आल्यानंतर, हजर राहण्याचे सुचना दिल्या. त्यामुळे दिनांक 18/03/2024 रोजी झालेल्या पडताळणी पंचनामा, सापळापूर्व पंचनामा, व सापळा परतीचा पंचनामा असा एकत्रीतरित्या करुन सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली व लोकसेवक यंानी पुन्हा बोलाविल्यावर सापळा कारवाई करण्याचे सर्व सापळा पथकाने ठरविले. सदरच्या कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

सपोनि श्री. टोकळे यांनी मला दिनांक 18/03/2024 रोजी पासून आजपावेतो माझेशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधला नाही अथवा तसा प्रयत्न केला नाही. यावरून माझी अशी खात्री झाली आहे की, सपोनि श्री. कैलास टोकळे हे माझेकडून लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत.

अशा प्रकारे लोकसेवक श्री. कैलास जयवंत टोकळे, सहायक पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा युनिट-1, काशिमिरा, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय यांना शासकीय लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करून माझे भावा विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयामध्ये जामिन मिळवून देण्यास मदत करण्याकरीता माझेकडे 10 लाख रू. लाचेची मागणी केली म्हणून, लोकसेवक श्री. कैलास जयवंत टोकळे, सहायक पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा युनिट-1, काशिमिरा, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असून, ती मी वाचून पाहिली, सदरची फिर्याद माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**
Rajendra Ganpatrav Kambale(I (Inspector)) / DGPRGKM7401 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**